**विषयः**- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.
( बाहेरुन येणा-या बसेस /ट्रॅव्हल्स मधील
प्रवाशांच्या वैद्यकीय तपासणी बाबत )

**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**

क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-

दि. १९/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

४) जिल्हा शल्य चिकीत्सक , नांदेड यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र.जिशचिनां/३८०८-११/२० दि.१८.०३.२०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे त्यानुसार बाहेर ठिकाणाहून नांदेड शहरात येणा-या प्रवाशामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये त्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा शल्यचिकीत्सक, नांदेड यांनी संदर्भ क्र.४ वरील कार्यालयीन आदेशाव्दारे नांदेड शहरात मध्यवर्ती बसस्थानक, बाफना पॉईंट, शर्मा ट्रॅव्हल्स कौठा, आसना टी पॉईंट या ठिकाणी प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पथके गठीत करण्यात आली आहे.

त्यामुळे बाहेर ठिकाणाहून नांदेड शहरात प्रवाशी घेवून येणा-या शासकीय तसेच खाजगी वाहन धारकांनी वरील नमुद ठिकाणीच प्रवाशाची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी प्रवाशांना इतरत्र शहरात न उतरविता केवळ वरील नमुद ठिकाणीच उतरवण्याची दक्षता घ्यावी अन्यथा संबंधितां विरुध्द भारतीय दंडसंहिता कलम १८८ नुसार दंडनिय /कायदेशिर कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
४) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) पोलीस अधीक्षक, नांदेड
६) उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड
७) सर्व खाजगी वाहनधारक यांना अनुपालनास्तव (मार्फत उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड )
८) विभागीय नियंत्रक, एसटी महामंडळ, नांदेड
९) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**